**सं.फौ.ख.क्र. १०२/२०२४**

**निशाणी क्र.१२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**

मी, शपथेवर निवेदन करतो की,

माझे नांव – आकाश अंकुश लाटे

माझे वय– २९ वर्षे व्यवसाय – शिक्षण

राहणार – कल्पनानगर कळंब तालुका – कळंब ,

जिल्हा – धाराशिव.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती बी. बी. मुंढे यांचेकडुन**

मी माझे आईवडील व बहिणीसह राहतो. माझा भाऊ अमर अंकुश लाटे हा मयत झालेला आहे. दिनांक २७.०८.२०२३ रोजी तो त्याचे मित्र महेश रमेश मगर, अजय शंकर कदम, सुरज विलास माळी व चालक आकाश बाळासाहेब सोनवणे यांचेसोबत टोयोटो इटियॉस गाडी क्रमांक एम एच ४८ ए ४२६६ ने कळंब येथून बार्शी येथे दुपारी ०४.०० वा. गेले. दिनांक २८.०८.२०२३ रोजी तेथून परत येत असताना रात्री ०२.०० वाजता येरमाळा घाटामध्ये आरोपी चालक हा अतिवेगाने, बेशिस्तपणे व निष्काळजीपणे घाटात गाडी चालवित होता. आरोपीचे चुकीमुळे गाडी खोल दरीत पलटी खात गेली. चालकाचे शेजारी माझा भाऊ अमर बसलेला होता. गाडी पलटी झाल्यावर तो बाहेर पडला व त्याला गंभीर दुखापत झाली. अपघात झाल्यानंतर आरोपी चालकाने पोलिस स्टेशनला न कळविता व माझ्या भावावर उपचार न करता तो तेथून पळून गेला. सदर अपघाताबाबत मला विजयकुमार महादेव ढगे यांनी फोनद्वारे सांगितले. मी घटनास्थळावर गेलो तेथून सरकारी रुग्णालय येरमाळा येथे गेलो. तेथे माझे भावाला डॉक्टरांनी मयत घोषीत केले. अपघाताबाबत मला माझे भावाचे मित्र महेश रमेश मगर,

अजय शंकर कदम, सुरज विलास माळी यांनी सांगितले. दिनांक ०४.०९.२०२३ रोजी मी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी १३ देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. मस्के यांचेकडुन –**

२. माझे शिक्षण बी.ए पदवी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत अपघाताचे वेळी मी माझे घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घरी असल्यामुळे कथीत अपघाताबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कथीत अपघात प्रत्यक्ष पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे कथीत अपघात कसा घडला व कोणाचे निष्काळजीपणामुळे घडला ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी असल्यामुळे कथीत वाहन कोण चालवित होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत अपघाताचे वेळी मी घरी असल्यामुळे अपघात काय व कसा घडला हे माहिती नसताना मी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, कथीत अपघातानंतर मी व माझे कुटूंबियांनी माझे मयत भावांचे मित्राशी चर्चा केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे मयत भावाचे मित्र महेश रमेश मगर, अजय शंकर कदम, सुरज विलास माळी यांचेशी विचारविनिमय करुन मी व माझे कुटूंबियांनी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली.

३. मला विजयकुमार ढगे यांचा फोन पाच वाजता आला होता. त्याचा

मोबाईल क्रमांक मला सांगता येणार नाही. फोन आल्यानंतर मी येरमाळा रुग्णालय येथे गेलो. मी तेथे किती वाजता पोहोचलो ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, येरमाळा पोसिल ठाण्यापासून येरमाळा सरकारी रुग्णालयाचे पायी अंतर सुमारे ०४ ते ०५ मिनिटाचे आहे.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, मी कथीत घटनेची तक्रार घटनेच्या दिवशी नोंदविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, येरमाळा दवाखान्यातून पोलिस ठाण्यात गेल्यावर पोलिसांनी त्यादिवशी माझा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, विजयकुमार ढगे व माझी ब–याच दिवसांपासून घनिष्ठ मैत्री आहे. विजयकुमार ढगे यांचे वडील उस्मानाबाद पोलिस ठाण्यात होते. विजयकुमार ढगे हे कळंब येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, विजयकुमार यांचा फोन कळंब येथून आला होता.

**५.** घटनास्थळावर जाण्यापुर्वी मी दवाखान्यात गेलो. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेच्या दिवशी मी घटनास्थळावर गेलो नाही. कथीत घटनास्थळावर मी किती वाजता गेलो ते मला सांगता येणार नाही. मी कळंब येथून येरमाळा दवाखान्यात माझ्या गाडीने गेलो.

**६.** माझ्या मयत भावाचे शिक्षण चालु होते तसेच तो सर्पमित्र होता. याव्यतिरिक्त त्याचा कोणता व्यवसाय होता ते मला माहित नाही. माझ्याकडे जुपीटर गाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मयत भाऊ दुचाकी व चारचाकी वाहन चालवितो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत फिर्यादमध्ये मी कारण नमुद केले नाही. मी स्वत:हून सांगतो की, माझे मयत भावाचे

विधीमुळे मला फिर्याद देण्यास उशीर झाला. माझे मयत भावाचे हिंदु परंपरेनुसार तेरा दिवसाचे विधी झाले.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, महेश रमेश मगर, अजय शंकर कदम, सुरज विलास माळी हे माझे भावाचे जिवलग मित्र आहेत. अझरुद्दीन मोमीन हा माझे भावाचा मित्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे भावाचा मोटार अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी कळंब न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताची नुकसान भरपाई मिळण्यासाठी मी व माझे कुटूंबियांनी महेश रमेश मगर, अजय शंकर कदम, सुरज विलास माळी यांचेशी संगनमत करुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. घटनास्थळावर रस्त्याचे काम चालु आहे किंवा कसे ते मला माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की, गेल्या पाच ते सात वर्षापासुन तथाकथीत घटनास्थळाजवळ रस्त्याचे काम चालु आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे वाहनांची वर्दळ असते. हे मला सांगता येणार नाही की, सदर रस्त्याचे काम चालु असुन तेथे ठिकठिकाणी खड्डे आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मिळण्यासाठी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

AMRUTA CHARUDATTA JOSHI
Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2024.12.18 15:16:40 +0530

कळंब.
दिनांक– १७/१२/२०२४.

(अमृता चा. जोशी),
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
**(न्यायालय क्र. २), कळंब.**